गोदातीर दि. 26/11/2021

# देगलूर महाविद्यालयात सात दिवसीय एनसीसी प्रशिक्षण शिबिर संपन्न




देगलूर– येथील देगलूर महाविद्यालयामध्ये ५२ महा बटालियन नांदेडचे कमांडिंग अधिकारी लेफ्ट.कर्नल वेत्रिवेलु यांच्या अधिकारअंतर्गत सात दिवसीय एन.सी.सी. प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले.

या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर या सात दिवसीय प्रक्षिणात कैडेट्स यांना ड्रिल प्रशिक्षण, रायफल प्रशिक्षण,रायफल फायरिंग आणि अभ्यासक्रम संदर्भात सर्व माहिती देण्यात आली आहे.

या प्रशिक्षण शिबिराच्या समारोपाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य आणि प्रशिक्षण देणारे लेफ्ट.डॉ. निरजकुमार उपलंचवार, सुबेदार मेजर महादेव भोसले, हवलदार त्रिलोक सिंह व सरोज कुमार आणि सिनियर कोंकेवार, प्रसाद तसेच महाविद्यलयाचे कार्यालयीन अधिक्षक गोविंद जोशी, किशन पांचाळ यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner